वैशिष्ट्यपूर्ण

# केळी पिकाच्या अधिक उत्पादनासाठी आंतरमशागत तसेच खत व्यवस्थापन



प्रा.डॉ. लक्ष्मण सुरनर
(मो.नं. ९४०४५९३२४३)
उद्यानविद्या विभाग, कृषी महाविद्यालय,
ता. रेणापूर, जि. लातूर



जसजशी केळीच्या झाडाची वाढ जोमाने होते तसतसे नवीन पाने येण्याचे प्रमाण वाढते. सर्वसाधारणपणे दर महिन्याला ४ ते ५ नवीन पाने येतात तेव्हा जुनी व खालची पाने पिवळी होऊन सुकतात. ती पिवळी किंवा सुकलेली पाने कापून टाकावीत. परंतु कुठलेही हिरवे पान कापू नये. केळफूल बाहेर पडायच्या आधी झाडावर कमीत कमी १५ ते १६ कार्यक्षम पाने असावीत. वाढीच्या काळात कमीत कमी १० ते १२ पाने झाडावर असतील याची काळजी घ्यावी.

केळीचे दर्जेदार उत्पादन घेण्यासाठी आंतरमशागत आणि योग्य खत व्यवस्थापन करणे खूप महत्त्वाचे आहे. आंतरमशागतीमध्ये केळीची बाग स्वच्छ ठेवणे, केळी लागवडीनंतर शेत भुसभुशीत रहावे म्हणून ३-४ महिन्यांपर्यंत उभी- आडवी कुळवणी करणे, झाडांना मातीची भर देणे गरजेचे आहे. तीन महिन्यांनंतर आंतरमशागत करू नये. वेळोवेळी तणांचा बंदोबस्त करावा. काही इतर महत्त्वाची आंतरमशागतीची कामे खालीलप्रमाणे आहेत.

**पिले कापणे** : केळी रोपे लागवडीपासून तिसऱ्या महिन्यानंतर मोठ्या प्रमाणात मुख्य खोडाच्या बाजूला पिलांची निर्मिती होते. ही पिले वेळोवेळी कापली नाहीत तर मुख्य पिकाशी स्पर्धा करतात व अन्नद्रव्याचा ऱ्हास करतात. त्यासाठी अशी पिले विळ्याने काढावीत. यासाठी कुठल्याही तणनाशकाचा उपयोग करू नये. त्यामुळे केळीच्या कंदाला इजा होऊन रोग व किडींचा प्रादुर्भाव होऊ शकतो.

**झाडाला आधार देणे** : टिश्यू कल्चर केळीच्या घडाचे सरासरी वजन २५ ते ३५ किलोच्या दरम्यान असल्याने वजनाने झाडे झुकतात किंवा सोसाट्याचा वारा आल्यानंतर मोडतात. म्हणून झाडाला बांबूचा आधार द्यावा.

**पाने कापणे** : जसजशी केळीच्या झाडाची वाढ जोमाने होते तसतसे नवीन पाने येण्याचे प्रमाण वाढते. सर्वसाधारणपणे दर महिन्याला ४ ते ५ नवीन पाने येतात तेव्हा जुनी व खालची पाने पिवळी होऊन सुकतात. ती पिवळी किंवा सुकलेली पाने कापून टाकावीत. परंतु कुठलेही हिरवे पान कापू नये. केळफूल बाहेर पडायच्या आधी झाडावर कमीत कमी १५ ते १६ कार्यक्षम पाने असावीत. वाढीच्या काळात कमीत कमी १० ते १२ पाने झाडावर असतील याची काळजी घ्यावी.

**केळफूल कापणे** : केळफूल बाहेर पडल्यानंतर आधी सर्व कळ्या मोकळ्या होतात. त्यानंतर लहान फुलफणी निघतात. अशा दोन फुलफण्या बाहेर पडल्यानंतर केळफूल कापावे. त्यात विलंब झाल्यास घडाच्या भरणीवर विपरीत परिणाम होतो.

**घड झाकणे** : केळीचा घड बाहेर पडल्यानंतर घडाच्या दांड्याचे उष्ण सूर्यप्रकाशापासून संरक्षण करणे गरजेचे आहे. त्यासाठी केळीच्या वाळलेल्या पानांची पेंढी करून ती घडांच्या दांड्यावर पानांमध्ये अडकवून दांडा आणि घडांचे उष्ण तापमान हवामानापासून संरक्षण करता येईल. अन्यथा दांड्यावर प्रखर उन्हामुळे काळा डाग पडतो व दांडा सडून घड गळून पडतो.

**सेंद्रिय खतांचा वापर** : केळी पिकासाठी सेंद्रिय खतांचा वापर हे केळी उत्पादनाच्या दृष्टीने जितके महत्त्वाचे आहे, तितकेच जमिनीच्या जैविक आणि भौतिक सुपीकतेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. केळीबागेस पीक लागवडीपूर्वीच हेक्टरी १०० बैलगाड्या चांगले कुजलेले शेणखत वापरावे; प्रत्येक खोडास किमान दहा किलो शेणखत वापरणे अत्यंत गरजेचे आहे. गांडूळ खत उपलब्ध असल्यास प्रत्येक खोडास किमान पाच किलो गांडूळ खत वापरावे. निंबोळी पेंड उपलब्ध असल्यास प्रत्येक खोडास अर्धा ते एक किलो निंबोळी पेंड वापरावी.

**हिरवळीच्या खतांचा वापर** : हिरवळीची खते हा सेंद्रिय खतांचा अतिशय स्वस्त असा पर्याय आहे. केळी लागवडीपूर्वी हिरवळीची पिके घेऊन जमिनीत गाडणे किंवा केळी लागवड केल्यावर दोन ओळींमध्ये हिरवळीच्या पिकांची लागवड करून फुलोऱ्यात आल्यानंतर केळीच्या खोडाजवळ गाडणे अशा दोन प्रकारे हिरवळीची खते वापरता येतात. त्यामध्ये ताग, धैंचा, चवळी, उडीद, मूग इत्यादी पिकांचा वापर करता येतो. हिरवळीच्या पिकांमुळे जमिनीची सुपीकता व मुख्य पिकाला नत्राचा पुरवठा होतो.

**जिवाणू खतांचा वापर** : जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी व केळी पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी जिवाणू खतांचा वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. केळीसाठी ॲझोस्पिरीलम या नत्र स्थिर करणाऱ्या व पी.एस.बी. या स्फुरद विरघळविणाऱ्या जिवाणू खतांचा प्रत्येकी २५ ग्रॅम प्रतिझाड (एकूण ५० ग्रॅम प्रतिझाड) केळी लागवडीच्या वेळेसच वापरणे गरजेचे आहे. जिवाणू खतांच्या वापरामुळे वातावरणातील नत्र स्थिर करून ते पिकाला उपलब्ध करून दिले जाते, तसेच जमिनीतील स्थिर झालेला स्फुरद पिकाला उपलब्ध करून दिला जातो.

**रासायनिक खतांचा वापर** : केळीच्या प्रतिझाडास

२०० ग्रॅम नत्र, ४० ग्रॅम स्फुरद आणि २०० ग्रॅम पालाश देण्याची शिफारस आहे. खतांचा कार्यक्षम वापर होण्यासाठी खोल बांगडी पद्धतीने खते द्यावीत. केळीसाठी जमिनीतून रासायनिक खते खालील वेळापत्रकानुसार द्यावीत.

| अ. नं. | खत देण्याची वेळ | युरिया | सिंगल सुपरफॉस्फेट (एसएसपी) | म्युरेट ऑफ पोटॅश |
|---|---|---|---|---|
| १ | लागवडीनंतर ३० दिवसांच्या आत | ८२ | २५० | ८३ |
| २ | लागवडीनंतर ७५ दिवसांनी | ८२ | - | - |
| ३ | लागवडीनंतर १२० दिवसांनी | ८२ | - | - |
| ४ | लागवडीनंतर १६५ दिवसांनी | ८२ | - | ८३ |
| ५ | लागवडीनंतर २१० दिवसांनी | ३६ | - | - |
| ६ | लागवडीनंतर २५५ दिवसांनी | ३६ | - | ८३ |
| ७ | लागवडीनंतर ३०० दिवसांनी | ३६ | - | ८३ |
| | एकूण (प्रति झाड) | ४३५ ग्रॅ. | २५०ग्रॅ. | ३३२ ग्रॅ. |

**केळीसाठी ठिबक सिंचनातून खते देण्याचे वेळापत्रक**

| अ. नं. | आठवडे | हजार झाडांसाठी खतांची मात्रा (किलो/आठवडा) | |
|---|---|---|---|
| | | युरिया | म्युरेट ऑफ पोटॅश |
| १. | १-१६ | ६.५ | ३ |
| २. | १७-२८ | १३ | ८.५ |
| ३. | २९-४० | ५.५ | ७ |
| ४. | ४१-४४ | -- | ५ |

टीप: वरील दिलेल्या तक्त्यातील खतमात्रेत माती परीक्षणानुसार योग्य ते बदल करावेत. (म.फु.कृ. राहुरी)

स्फुरदाची संपूर्ण मात्रा २५० ग्रॅम सिंगल सुपरफॉस्फेट व १० किलो शेणखत याप्रमाणे लागवडीच्या वेळी जमिनीतून द्यावी.

### सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर

मॅंगेनिजसाठी मॅंगेनिज सल्फेट, तांब्यासाठी कॉपर सल्फेट आणि बोरॉनसाठी बोरॅक्स या सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खताचा वापर करावा. जस्त आणि लोह या सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास, जस्तासाठी झिंक सल्फेट आणि लोहासाठी फेरस सल्फेट या सूक्ष्म अन्नद्रव्ययुक्त खतांचा प्रत्येकी पाच ते दहा ग्रॅम प्रतिझाड या प्रमाणात शेणखतात मुरवून वापर करावा. सूक्ष्म अन्नद्रव्यांचा फवारणीद्वारे वापर करावयाचा असल्यास जस्तासाठी झिंक सल्फेट आणि लोहासाठी फेरस सल्फेटच्या ०.५ टक्के तीव्रतेच्या द्रावणाची फवारणी करावी. त्यासाठी दहा लिटर पाण्यात ५० ग्रॅम झिंक सल्फेट किंवा फेरस सल्फेट यांपैकी एक मिसळून द्रावण तयार करावे.



### केळी घडाची प्रत सुधारण्यासाठी

घडावर आठ ते नऊ फण्या ठेवून खालच्या फण्या कापाव्यात. केळीचा घड पूर्ण निसवल्यावर केळफूल तोडावे. घडावर १०० लिटर पाण्यात ५० ग्रॅम पोटॅशियम डायहायड्रोजन फॉस्फेट अधिक १०० ग्रॅम युरिया अधिक स्टीकर १० मि.ली. मिसळून फवारणी केल्याने लांबी आणि घेर वाढून केळीच्या वजनातही वाढ होते. ■